Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV ISSUE-III MAR. 2017

Address
· Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
· Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
· (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
· aiirjpramod@gmail.com
· aayushijournal@gmail.com

Website
· www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

जागतिकीकरण आणि आंबेडकरी कविता

डॉ. विनोद अवधुतराव कोकणे
मराठी विभाग
जे.डी.पाटील सांगळूदकर महाविद्यालय,
दर्यापूर, जि. अमरावती

जागतिकीकरण ही अर्थशास्त्रीय संकल्पना १९९६ पासून अंमलात आली असली तरी तिच्या मुळाशी खासगीकरण आणि उदारीकरण या दोन संकल्पना दडलेल्या आहेत. जागतिकीकरणाने जगाला 'ग्लोबल खेडे' ठरवून भांडवलदाराला जगातल्या कोणत्याही देशात जावून आपले उत्पादन तयार करण्याचा आणि विकण्याचा अधिकार बहाल केला. असे असले तरी भारतात आर्यांच्या आगमनाने जागतिकीकरणाला सुरवात झाली. आर्य भारतात आले आणि इथली सुजलाम-सुफलाम भूमी पाहून त्यांनी येथे स्थिरावणे सुरु केले. या देशातील मुळ भूमीपुत्रावर आक्रमण केले, त्यांना युध्दात जिंकले. त्यांनी आपल्या विरुध्द बंड करू नये म्हणून त्यांच्यासाठी आचारसंहिता तयार केली. त्यातूनच पुढे जातिव्यवस्था निर्माण झाली. आर्यांच्या शोषणातून निर्माण झालेल्या विषमतेविरुध्द समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय, या मूल्यांची घोषणा करून भ. बुध्दाने क्रांती घडवून आणली. नालंदा, तक्षशिलासारखी विद्यापीठे निर्माण केली. या विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी जगभरातून विद्यार्थी येत होते. हे जागतिकीकरणाचे नवे पर्व होते.

स्वातंत्र्योत्तर भारतात आधुनिकीकरण, तंत्रज्ञान व विज्ञान याकडे अधिक भर देण्यात आला. मराठी भाषेसोबतच इंग्रजी शिक्षणाचे धडे देण्यात आले. परंतु जागतिकीकरणाच्या प्रभावाने इंग्रजी राष्ट्रभाषा विरहीत समस्त राष्ट्रांमध्ये भाषिक प्रश्नांची समस्या निर्माण झाली. परिणामस्वरुप त्या-त्या प्रदेशातील राष्ट्रभाषा-राजभाषा आणि भाषेपुढे मोठे संकट उभे झाले. या आवर्तामध्ये मराठी भाषेच्या समृध्दीसाठी तसेच मराठी साहित्याचे संवर्धन व्हावे यासाठी प्रयत्न अनेक शतकापासून होत आहे. भाषा, समाज, संस्कृती आणि साहित्य हे घटक परस्पर पुरक आहे. या सर्व घटकांची गती किंवा अधोगती एकमेकांवर विसंबुन आहे. या संदर्भात डॉ. अंजली सोमन लिहितात, "अन्य कोणत्याही भाषेशी संबंध आला नाही तरी भाषेत स्वाभाविक परिवर्तने होतच असतात."

मराठी साहित्यात कथा, कादंबरी, कविता, नाटक व निबंध या सर्व वाङमय प्रकाराची भाषा वेगवेगळी असते. कुठे भावनेला थारा असतो. तर कुठे बुध्दीची कदर केली जाते. भाषा ही वेगवेगळी असली तरी तिचा उपयोग आपल्या मनातील अर्थ दुसऱ्यांना समजावा एवढाच असतो म्हणून साहित्यामध्ये भाषा ही महत्वाची असते.

जागतिकीकरण आणि आंबेडकरी कविता :

साहित्य हे लेखकाचे अथवा कविंना आलेल्या अनुभवांचा पाढाच असतो. काळाचे पडसाद त्यांच्या साहित्य लेखनावर पडत असतात. कवी ज्या काळात जन्मतो, ज्या वातावरणाच्या व पर्यावरणाचा तो अनुभव घेतो. त्या अनुभवाचे प्रतिबिंब साहजिकच त्याच्या कवितेत उमटलेले असते. बहुतांश कवी ग्रामीण भागात जन्माला आलेले असल्याने बऱ्याच कविंच्या लेखनातून ग्रामीण जीवनाचा अंश जाणवतो. त्यामुळे या कवींच्या कवितेत प्रखर अशा महानगरीय जाणिवा व्यक्त झाल्या आहे. नव्वदोत्तर कालखंडात लिहिल्या जात असलेल्या समकालीन कवितेला अन्य संदर्भासह जागतिकीकरणाचा विशेष संदर्भ आहे. जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेमुळे मानवाचे भावविश्वच बदलुन गेले आहे. मानवी भावजीवनातले हे सगळे बारकावे सुनिल अभिमान अवचार यांनी आपल्या कवितेतून अचुकपणे मांडलेले आहे.....

"या ग्लोबल वर्तमानात
भावना झाली आहे जाहिरात
आणि

मेंदुचे झाले आहे कॅम्प्युटर
तत्त्वज्ञान झाले आहे Use & Throw
संस्कृती झाली आहे रखेल."
(ग्लोबल वर्तमानाच्या कविता पृ.९)

येथील महानगरीय जाणिव बदलत चालल्यामुळे जागतिकीकरणात मानवी भावनेला किंमत उरली नाही. ती युज अँड थ्रो' झाली आहे. त्यामुळे तत्वज्ञान, संस्कृती घडविण्याऐवजी विकृती निर्माण होत आहे.

जागतिकीकरणामुळे निर्माण होत असलेली सामाजिक विषमता ही आंबेडकरी कवितेचा चिंतनाचा विषय आहे. वेदना, विद्रोह आणि नकार, त्याचबरोबर विज्ञाननिष्ठा याला वैश्विक पातळीवर शोध घेण्याचे धाडस आंबेडकरी कविताच करू शकते. माणसाला दु:खमुक्त करून मानवी जीवनाच्या बदलत्या काळानुरुप उत्कर्ष साधण्याकरीता प्रयत्नशील राहते. यावरून मराठी कवितेच्या अंतरंगात बदल करण्याची ताकद आंबेडकरी कवितेने जोपासली आहे.

आधुनिकीकरणाच्या नावाखाली माणसांचा होणारा कोंडमारा त्यावर होणारी अत्त्याचाराची मालिका स्पष्ट करतांना कवी यशवंत मनोहर यांनी समाजातील दु:ख, राग, अपेक्षाभंग जगण्याची धडपड, निराशा पदरी पडूनही लोकशाही मूल्यांवर प्रचंड असणारी निष्ठा आणि जगतांना येणारे दाहक अनुभव आपल्या कवितेतुन मांडलेले आहे.

"बंधो खाजगीकरण, उदारीकरण काहीही होवो
जागतिकीकरण, बाजारीकरण काहीही होवो
आपले उध्दवस्तीकरणच वाढत आहे."

सामान्यपणे खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या धोरणामुळे सामान्य माणसाचे जीवन उध्दस्त होण्याच्या वाटेवर आहे. जागतिकीकरणाच्या अनुषंगाने कवी अरूण काळे याची कविता परखडपणे विचार मांडते. कारण सामान्य माणसाला समानतेच्या प्रवाहातून बाजुला सारून नवे ट्रेंटस आले आहेत. अन्न पाण्यावाचून तडफडणाऱ्या माणसांना सायबर, हार्डवेअर, सॉफटवेअर असे कधी स्वप्नही पडले नसेल ते जागतिकीकरणाच्या बाजारात बघायला मिळते आहे. म्हणून दलितांच्या वाटयाला कंगालपणा, शोषिकता आणि दुर्बलता आलेली आहे म्हणून कवी लिहितात.....

"दलिततत्व नष्ट करण्याऐवजी
दलितच डिलीट झाला.
गुटखा गिळुन बसला नेता
मुप्रीतल्या टाईल्ससारखे निखळले हात."

यावरून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत दलित कुठेच दिसणार नाही याची काळजी भांडवलशाहीच्या पुरस्कर्त्यांनी घेतलेली आहे असे दिसून येते.

जागतिकीकरणाच्या अनुषंगाने आंबेडकरी कविता अधिक प्रगल्भ आणि चिंतनशिलतेच्या पातळीवर रेखाटणारे प्रतिभाशाली कवी लोकनाथ यशवंत यांनी आत्मशोध आणि आत्मविष्काराचे अंगाने कविता लेखन केलेले आहे म्हणून ते लिहितात,

"जोहार करणारे आमचे हात
आम्ही कापुन फेकले
आता शस्त्राशिवाय हातात काही नाही."

यावरून प्रस्तापित समाज व्यवस्थेला शरण जाण्यासाठी किंवा झुकण्यासाठी हे हात नसल्याची कबुली कवी देतात तर त्या अन्यायाविरुध्द बौध्दिक लढाई लढण्याची हिंमत आंबेडकरी जनतेत निर्माण झाली आहे. अन्याय करणाऱ्यापेक्षा अन्याय सहन करणारा जास्त गुन्हेगार असतो. हे आंबेडकरवादी तत्वज्ञान प्रस्थापित समाज व्यवस्थेविरुध्द लढण्याची परिस्थिती निर्माण करण्याहेतूने गुलामी, लाचारी, लादणारी व्यवस्था नाकारण्यासाठी सामान्य माणसं दगडालाच शस्त्र बनवतात.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारक्रांतीच्या आत्मबळामुळे माणसाला माणुसकीचे जगणे शिकविलेले आहे.

एकंदरपणे जागतिकीकरण, खासगीकरण आणि उदारीकरण या व्यवस्था नव्याने जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्था टिकविण्याचे कार्य करीत आहे. दलित पिडीत शोषितांना पायाखाली चिरडून त्याचे अस्तित्व, माणुसपण नाकारणारे डाव आखले

जात आहेत. म्हणून शोषित माणसाचं भरडलं जाणं शोकात्मक स्वरुपाचे आहे. याविरुध्द बंड करण्याचे आवाहन पहिल्याप्रथम दलित कवितेने हाती घेतलेले आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

संदर्भ सूची :

१) परिवर्तन त्रैमासिक अंक २ रा "जागतिकीकरण आणि दलित समाज" हा डॉ. सुखदेव थोरात यांचा लेख संपा- प्रा गंगाधर अहिरे प्रतिभा प्रकाशन, नाशिक, एप्रिल/मे/जुन/पृ.क्र. १४.
२) सी.पी. खेरा- 'जागतिक समस्या, आशय आणि अनुभव' दिलिपराज प्रकाशन प्रा. लि. सदाशिवपेठ, पुणे. जाने. २००८, पृ.क्र. १०.
३) मराठी जनसाहित्य - स्मरणिका - फेब्रु. २००७ संपा - डॉ. रा.गो. चवरे. जागतिकीकरण आणि जनसाहित्य डॉ. सुभाष सावरकर, पृ.क्र. ९
४) साहित्य संस्कृती आणि जागतिकीकरण' भालचंद्र नेमाडे, लोकवाङमय गृह मुंबई, ऑगस्ट २००९ पृ. १.